**मुंबई :** पुण्यातील वैष्णवी हगवणे मृत्यू हगवणे कुटुंबीयांचे निकटवर्तीय असलेले पुण्यातील तत्कालीन पोलीस महानिरीक्षक जालींदर सुपेकर यांचा सहभाग व हस्तक्षेप तपासादम्यान समोर आला आला आहे. त्यामुळे त्यांना या प्रकरणाच्या तापसापासून दूर ठेऊन सहआरोपी करावे, या प्रमुख शिफारस महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीने केली आहे.

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाच्या तपासात अनेक त्रुटी, उणिवा असल्याचे समितीने आपल्या अहवालातून निदर्शनास आणून दिल्या आहेत. सकृतदर्शनी आत्महत्या दिसत असली तरीही हे प्रकरण पूर्णतः कौटुंबिक हिंसाचार, अत्याचार व हुंडाबळीचे प्रकरण आहे. त्या दिशेनेच तपास होणे आवश्यक आहे, अशी शिफारस समितीने केली. तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी जालिंदर सुपेकर यांची चौकशी करून त्यांचा सहभाग आढळल्यास त्यांना निलंबित करून सहआरोपी करण्याची आवश्यकता व्यक्त केली आहे. हगवणे कुटुंबीयांचे निकटवर्तीय असलेले पुण्यातील तत्कालीन पोलीस महानिरीक्षक जालींदर सुपेकर यांचा सहभाग व हस्तक्षेप समोर आला आल्याने या प्रकरणाच्या तापसापासून सुपेकर यांना दूर ठेवावे असे समितीने अहवालात म्हटले आहे.

### समितीच्या अन्य शिफारशी

- वैष्णवीच्या मुलाचा ताबा कायमस्वरुपी तिच्या आई-वडिलांकडे द्या.
- राज्य महिला आयोगाला तपासाचा आणि न्यायालयीन अधिकार द्यावा.
- आयोगावर महिला आयएएस अधिकाऱ्यांची सचिव म्हणून नेमणूक करावी.
- राज्य महिला आयोगाचा ३५ पदांचा आकृतीबंध ४५ पदांचा करावा.
- समुपदेशकांसह मानसोपचार तज्ज्ञ उपलब्ध करून द्या.

## रोहित पवारांविरुद्धच्या आरोपपत्राची दखल

**मुंबई :** राज्याची शिखर बँक असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (एमएससीबी) घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार रोहित पवार यांच्याविरुद्ध सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या आरोपपत्राची विशेष न्यायालयाने शुक्रवारी दखल घेतली. तसेच, फसवणुकीद्वारे केल्या गेलेल्या साखर कारखान्याच्या लिलावात पवार हे सहभागी असल्याचे सकृतदर्शनी निष्पन्न होते, असे निरीक्षण नोंदवून पवार यांच्यासह संबंधितांना न्यायालयाने समन्स बजावले.



खासदार, आमदारांविरुद्धच्या खटल्यांसाठी स्थापन केलेल्या विशेष न्यायालयाचे विशेष न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी रोहित पवार यांच्यासह त्यांचे जवळचे सहकारी आणि व्यावसायिक राजेंद्र इंगवले आणि पवार यांच्या मालकीच्या बारामती ॲग्रो लिमिटेड यांना समन्स बजावले होते.

# राजकीय ईर्ष्येपोटी मराठा आरक्षणाचा घाट

## विरोध करणाऱ्या याचिकाकर्त्यांचा दावा

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** राजकीय ईर्ष्येपोटी आणि निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मराठा समाजाला आरक्षण देण्याचा घाट गेल्या काही वर्षांपासून घालण्यात येत असल्याचा दावा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकाकर्त्यांतर्फे शुक्रवारी उच्च न्यायालयाच्या विशेष पूर्णपीठासमोर केला. सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याच्या २०२४ च्या राज्य सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवरील सुनावणीला शुक्रवारी नव्याने सुरुवात झाली. त्यावेळी आरक्षणविरोधी याचिकाकर्त्यांनी हा दावा केला.

राज्यात निवडणुकीचे वारे वाहू लागल्यानंतर मराठा आरक्षणाचा मुद्दा चर्चेला येतो. अकरा वर्षांपूर्वी, २०१४ मध्ये पहिल्यांदा मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत कायदा करण्यात आला. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरच हा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर, २०१८ मध्येही विधानसभा निवडणुकांच्या आधी मराठा समाजाला आरक्षण देणारा कायदा





करण्यात आला. राज्यभर मराठा समाजाकडून केल्या गेलेल्या हिंसक आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आरक्षणाचा कायदा केल्याचा दावा तत्कालीन सरकारने केला होता. हा कायदा सर्वोच्च न्यायालयाने २१ मे २०२१ रोजी रद्द केला. तो रद्द करताना सर्वोच्च न्यायालयाने मराठा समाज मागास नसल्याचा निर्वाळाही दिला होता. तरीही, मराठा समाज मागास आहे, हे दाखवण्यासाठी सरकारने गेल्या वर्षी सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्ग आयोग स्थापन करून मराठा समाजाला सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांत दहा टक्के आरक्षण देण्यात आले, असे संचेती यांनी न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या विशेष पूर्णपीठाला सांगितले.

## मुंबई परिसरातील मतदारसंघ अमराठी करण्याचा डाव

*(पान १ वरून)* जाणार नाही. राज्य सरकारने हिंदी सक्तीचा प्रयत्न करून पाहावा, केवळ दुकाने नाही तर शाळाही बंद पाडू असा इशारा त्यांनी दिला.

मराठी माणूस हा महाराष्ट्राचा मालक आहे. माज घेऊन जर कोणी अंगावर आला तर त्याला ठेचल्याशिवाय राहणार नाही हे महाराजांचे हिंदवी राज्य आहे. आम्ही कुणाचे गुलाम नाही. या प्रांतावर अधिकार असेल तो मराठी माणसाचा आहे असे त्यांनी ठणकावले.

केंद्र शासनाने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय वर्षभरापूर्वी घेतला आहे. तरी आजतागायत त्यासाठी एक रुपयाही दिला नाही.चित्रपटसृष्टी वगळता, हिंदी भाषेने कोणाचेही भले केलेले नाही. तरीही सरकार हिंदीला मोठे करण्याचा प्रयत्न करत आहे. हिंदी भाषेमुळे अडीचशेहून अधिक मातृभाषांचे नुकसान केले. मात्र, महाराष्ट्रात हिंदीचे हे प्रयत्न यशस्वी होऊ देणार नाही असेही ठाकरे यांनी सभेत सांगितले. भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांच्या वादग्रस्त वक्तव्यावर मुंबईत येऊन दाखवा असे आव्हान ठाकरे यांनी दुबे यांना दिले.

# धार्मिक तेढ निर्माण करण्यासाठी 'अतिक्रमण'चा बनाव!

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** सध्या आपल्याकडे संशोधन करून पुराव्यावर आधारित कोणतीच कारवाई केली जात नाही. यामुळे जातीयवाद वाढीस लागून त्यातून भय निर्माण करण्याचे काम सध्या सुरू आहे. याचाच एक भाग म्हणजे धार्मिक तेढ निर्माण करण्यासाठी 'अतिक्रमण' या मुद्द्याचा बनाव केला जात असून यातून बदला घेण्याची भावना स्पष्ट दिसून येते, असे मत माजी न्यायमूर्ती अभय ठिपसे यांनी व्यक्त केले.

विशाळगड अतिक्रमण हटवण्याच्या आंदोलनावेळी हिंसक वळण लागून विशाळगडच्या पायथ्याला असलेल्या गजापूर गावातील दुकाने, घरे, प्रार्थनास्थळ यांची तोडफोड करण्यात आली. या घटनेला १४ जुलै रोजी एक वर्ष पूर्ण झाले. त्यानिमित्त सेंटर फॉर स्टडी ऑफ सोसायटी ॲण्ड सेक्युलॅरिझम (सीएसएसएस), सलोखा संपर्क गट आणि असोसिएशन फॉर प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राइट्स (एपीसीआर) या संस्थांनी संयुक्तरित्या तयार केलेल्या 'विशाळगड धार्मिक राजकारणाचे नवे पर्व' या सत्यशोधन अहवालाचे शुक्रवारी मुंबई प्रेस क्लब येथे प्रकाशन केले. या प्रसंगी माजी न्यायमूर्ती अभय ठिपसे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते.

घटनेने दिलेले हक्क सारखे असताना केवळ एका विशिष्ट हेतूसाठी अल्पसंख्याकांना दुय्यम दर्जा देण्याचे कारस्थान सुरू आहे. हिंदूराष्ट्राच्या नावाखाली जातीयवाद वाढीस लागला असून विकृत मनोवृत्ती तयार झाली आहे, असे ठिपसे म्हणाले.

- गजापूर गावात झालेल्या तोडफोडीला एक वर्ष उलटले तरीही पीडितांना न्याय मिळालेला नाही, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. पीडितांना फारच कमी भरपाई देण्यात आली असून अनेकांना ती मिळालेली नाही. याचबरोबर विशाळगडावरील मलिक रेहान दर्ग्याच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांमुळे येथील पंचक्रोशीला रोजगार मिळतो. अतिक्रमणाच्या मुद्द्यावरून उद्भवलेल्या वादाचा परिणाम दर्ग्यात येणाऱ्यांच्या संख्येवर झाला आहे, असे या अहवालात म्हटले आहे.

# पक्षी मृत्यूप्रकरणी अध्यक्ष, सचिवांवर गुन्हा

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे :** घोडबंदर येथील एका गृहसंकुलाजवळील वृक्षांची फांदी छाटण्याचे काम सुरू असताना फांद्यांवरील काही घरटी खाली कोसळून पक्ष्यांचा मृत्यू झाला होता. या मृत्यूप्रकरणात गृहसंकुलाचे सचिव, अध्यक्ष यांच्यासह तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. तसेच वृक्ष छाटल्याप्रकरणी महापालिकेने देखील कासारवडवली पोलिसांत तक्रार दिली आहे. तर, जखमी पक्ष्यांपैकी पाच पक्ष्यांचा मृत्यू झाल्याने आता मृत पक्ष्यांची संख्या ५० इतकी झाली आहे.

घोडबंदरच्या आनंदनगर भागात ऋतू एनक्लेव्ह या गृहसंकुलाजवळील वृक्षांच्या फांदी छाटणी दरम्यान गुरुवारी ४५ पक्ष्यांच्या मृत्यू झाला. तसेच या घटनेत अनेक अंडी खाली पडून फुटली. याप्रकरणी पक्षीप्रेमींनी आवाज उठवत संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. गुरुवारी रात्री महापालिकेने गृहसंकुलाच्या पदाधिकारी, कर्मचारी आणि ठेकेदारांची चौकशी करण्याबाबतचे पत्र कासारवडवली पोलिसांना पाठवले. तर, वनविभागाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यानंतर गृहसंकुलाचे सचिव, अध्यक्ष यांच्यासह तिघांवर वनविभागाने गुन्हा दाखल केला.

### आणखी पाच पक्ष्यांचा मृत्यू

- या घटनेत गुरुवारी ४५ पक्षी मृत पावले होते. तर, शुक्रवारी मृतांच्या आकड्यात वाढ झाली. जखमी अवस्थेत उपचार घेत असलेल्या आणखी पाच पक्ष्यांचा मृत्यू झाल्याची माहिती मायपलक्लब फाऊंडेशनच्या संचालक आदिती नायर यांनी दिली. तर सुमारे २० पक्षी वाईल्ड लाईफ असोसिएशन या संस्थेकडे सोपावण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.
- या घटनेत मृत पावलेले पक्षी मे महिन्याच्या शेवटी या परिसरात स्थलांतर करतात. जूनच्या दरम्यान त्यांचा प्रजननाचा काळ असतो. या पक्ष्यांच्या पिल्लांची सप्टेंबरपर्यंत पूर्ण वाढ होऊन ते भरारी घेतात. त्यानंतर हे पक्षी या परिसरातून पुन्हा स्थलांतरित होतात, अशी माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्यावतीने देण्यात आली.

# मनभावन ऋतूचा आनंद सोहळा अनुभवण्याची संधी

*(पान १ वरून)*

आहे. श्रावण महिन्याची सुरुवातच नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी यांसारख्या सणांनी होते. या सणवारांच्या निमित्ताने खास श्रावणातील उपवासाचे पदार्थ, गोडाधोडाचे पदार्थ, काही पारंपरिक प्रांतीय पदार्थ घरोघरी निगुतीने केले जातात. अशा श्रावणातील खास पदार्थांची पाककृती सादर करत बक्षिसे मिळवण्याची संधी या कार्यक्रमातील पाककला स्पर्धेच्या निमित्ताने मिळणार आहे.

श्रावणातील याच सणवारांची रेलचेल आणि मराठमोळा साजशृंगार यांचेही घट्ट नाते आहे. या सणांच्या निमित्ताने खास ठेवणीतले पोशाख, साड्या, पारंपरिक दागिन्यांचा साज याची जय्यत तयारी केली जाते. महाराष्ट्राच्या विविध प्रांतात सण साजरे करण्याची पद्धत वेगळी, तसेच त्या त्या प्रांतातील भौगोलिक-सामाजिक वातावरणाप्रमाणे येथील विविध समाजांच्या पेहरावातही वैविध्य आढळून येते. असा पारंपरिक मराठमोळा पेहराव करून बक्षिसे लुटण्याची संधी देणारी 'मराठमोळा साजशृंगार' ही स्पर्धाही या कार्यक्रमात होणार आहे. तसेच मंगळागौरीच्या खेळाचे सादरीकरण आणि पाऊसगाण्यांच्या चिंब स्वरांमध्ये न्हाऊन निघण्याचा आनंदही 'लोकसत्ता श्रावणरंग' या कार्यक्रमातून घेता येणार आहे. या हिरव्या ऋतूचा बरवा आनंद लुटण्यासाठी 'लोकसत्ता श्रावणरंग' या कार्यक्रमात सहभाग कसा घ्यायचा ते या कार्यक्रमांचे ठिकाण, तारखा आदी तपशील लवकरच 'लोकसत्ता'तून तुमच्यापर्यंत पोहोचवण्यात येईल.








**WANTED**

Applicationsare invited for the post of Principal from eligible candidates.
Name of College: Dr. Annasaheb G. D. Bendale Mahila Mahavidyalaya, Jalgaon

| Sr. No. | Designation | No. of Post | Nature of Post (Granted / Non Granted / permanent Non Granted) | Category |
|---|---|---|---|---|
| 1 | Principal | 01 | Granted | ISOLATED |

**Minimum Qualifications for Appointment to the post of Principal in colleges, as per UGC Regulations, 2018 & Maharashtra Govt. GR dated: 8th March, 2019 and 10th May 2019.**
Details of advertisement, Education Qualification, Eligibility, Category etc. information is available on college website https://www.agdbmmjal.ac.in and KBCNM University website – https://nmu.ac.in/en-us/Useful-Links/Job-Openings.
Application giving full details about educational qualifications experience etc. along with the documents should reach at the address of **The President, Lewa Educational Union,Jilha Road, Jilha Peth, Jalgaon,425001 (M.S.)** within fifteen (15) days of the publication of this advertisement.

Mr. Nandkumar Gopalrao Bendale
President



**महानिर्मिती**
**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**
मध्यवर्ती खरेदी विभाग
प्रकाशगड, दुसरामजला, प्लॉट नं. ९, स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०००५१

**निविदा सूचना क्रमांक : सीपीए - २५ -२०२५**

खालील बाबींचा पुरवठा करण्यासाठी विहित नमुन्यातील दोन लिफाफे इलेक्ट्रॉनिक निविदा मागविण्यात येत आहे.

निविदा / आरएफएक्स क्रमांक : एस.पी./टी. - ०४१२ /०७२५ (आर एफ एक्स : ३०००६००५०)

निविदा विवरण : परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या यूनिट सहाच्या रेसिप्रोकेटिंग कॉम्प्रेसरचे स्क्रू कॉम्प्रेसरमध्ये अपग्रेडेशन करणेबाबत.

निविदा विक्री करण्याची अंतिम तारीख व वेळ : ०७/०८/२०२५ - १०.०० वाजे पर्यंत

संपर्क : मुख्य अभियंता (म.ख.वि.) दूरध्वनी क्र : ०२२-६९८५३६१८.

अधिक तपशिलाकरिता https://eprocurement.mahagenco.in/ या वेबसाईटला भेट द्या.

**मुख्य अभियंता (म.ख.वि.)**



**transworld**

सीआयएन : एल६३०००एमएच१९८८पीएलसी०४८५००
**नोंदणीकृत पत्ता** : डी ३०१-३०५, लेव्हल ३, टॉवर II, सिवुडस् ग्रॅन्ड सेन्ट्रल, प्लॉट न. आर १, सेक्टर ४०, नेरुळ नॉड, नवी मुंबई ४००७०६ **फोन. नं.**: ०२२ ६८११ ०३००
**फॅक्स** : ०२२ ६८११ ०३३३ **ई-मेल**: investor.ssll@transworld.com
**संकेत स्थळ**: https://www.transworld.com/shreyas-shipping-and-logistics.html

**सूचना**

**कंपनीच्या इक्विटी शेअर्सचे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (IEPF) मध्ये हस्तांतरण.**

शेअरहोल्डर्सना येथे कळविण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १२४(६) च्या तरतुदींनुसार, गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (लेखा, लेखापरीक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम, २०१६ च्या नियम ६ सह वाचले जाणारे आणि त्यातील कोणत्याही सुधारणांनुसार, २०१७-२०१८ आर्थिक वर्षासाठी घोषित केलेला अंतिम लाभांश, जो ७ वर्षांच्या कालावधीसाठी दावा न केलेला होता, तो २५ ऑगस्ट २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी आयईपीएफमध्ये जमा केला जाईल. ज्या संबंधित शेअर्सवर सलग सात वर्षे दावा न केलेला होता ते देखील नियमांमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार हस्तांतरित केले जातील.

आयईपीएफ नियम २०१६ च्या नियम ६(३) मधील तरतुदी आणि काही सुधारणा असल्यास, कंपनीने ज्या सदस्यांचा लाभांश सलग सात (७) वर्षांपासून दावा न केलेल्या स्थितीत आहे त्यांच्या नवीनतम उपलब्ध पत्त्यावर संबंधित भागधारकांना वैयक्तिकरित्या कळवले आहे, त्यांना २०१७-२०१८ आणि त्यानंतरच्या आर्थिक वर्षासाठी अंतिम लाभांश आयईपीएफकडे हस्तांतरित करण्यापूर्वी दावा करण्याचा सल्ला दिला आहे. त्याची तपशील कंपनीच्या वेबसाइट https://www.transworld.com/transworld-shipping-lines/unclaimed-unpaid-dividend/ वर उपलब्ध आहेत.

ज्या शेअर्सचे प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स आहेत आणि ज्यांचे शेअर्स IEPF मध्ये हस्तांतरित करण्यास पात्र आहेत, त्यांनी हे लक्षात ठेवावे की कंपनी त्यांच्याकडे असलेल्या मूळ शेअर्सऐवजी डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट IEPF मध्ये हस्तांतरित करण्यासाठी जारी करणार आहे आणि अशा जारी झाल्यानंतर, कंपनी कॉर्पोरेट कारवाईद्वारे डिपॉझिटरीला डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट DEMAT फॉर्ममध्ये रूपांतरित करण्यासाठी आणि IEPF च्या नावे हस्तांतरित करण्यासाठी कळवेल. मूळ शेअर्सधारकांच्या नावावर नोंदणीकृत मूळ शेअर सर्टिफिकेट स्वयंचलितपणे रद्द होतील आणि ते नॉन-नेगोशिएबल मानले जातील. डिमटेरियलाइज्ड स्वरूपात शेअर्स असलेले आणि ज्यांचे शेअर्स IEPF मध्ये हस्तांतरित करण्यास पात्र आहेत, त्यांनी हे लक्षात ठेवावे की कंपनी कॉर्पोरेट कारवाईद्वारे डिपॉझिटरीला IEPF च्या DEMAT खात्याच्या नावे शेअर्स हस्तांतरित करण्यासाठी कळवेल.

जर कंपनीला १९ ऑगस्ट २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी संबंधित भागधारकांकडून कोणताही संदेश मिळाला नाही, तर कंपनी आयईपीएफच्या आवश्यकतांचे पालन करण्यासाठी, नियमांमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार २०१७-२०१८ या आर्थिक वर्षासाठी कंपनीने घोषित केलेला लाभांश आयईपीएफला हस्तांतरित करेल.

कृपया लक्षात ठेवा की दावा न केलेल्या लाभांश रकमेबाबत आणि आयईपीएफकडे हस्तांतरित केलेल्या शेअर्सबाबत कंपनीविरुद्ध कोणताही दावा करता येणार नाही. नियमांमध्ये विहित केलेल्या प्रक्रियेचे पालन करून शेअरहोल्डर आयईपीएफ अधिकाऱ्यांकडून लाभांश आणि संबंधित शेअर्स, जर काही असतील तर, त्यांच्यानुसार सर्व फायदे मागू शकतात.

न भरलेला लाभांश मिळविण्यासाठी किंवा तुम्हाला कोणतीही माहिती/स्पष्टीकरण हवे असल्यास, कृपया आमच्या RTA मेसर्स MUFG इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) ला लिहा किंवा संपर्क साधा., सी-१०१, २४७ पार्क, L.B.S. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०००८,दूरध्वनी क्रमांक: ८१०८११६७६७,ई-मेल: rnt.helpdesk@in.mpms.mufg.com. कृपया तुमच्या सर्व संपर्कांमध्ये खालील तपशील प्रदान करा: १. कंपनीचे नाव, २. फोलिओ क्रमांक किंवा डीपी आणि क्लायंट आयडी, ३. शेअरहोल्डरचे नाव, ४. संपर्क क्रमांक, ५. ईमेल आयडी. तसेच पत्त्याचा पुरावा म्हणून शेअरहोल्डरचे स्व-प्रमाणित केवायसी कागदपत्रे जसे की पॅन, रद्द केलेले चेक लीफ आणि नवीनतम युटिलिटी बिल प्रदान करा.

स्थळ : नवी मुंबई
दिनांक: १९ जुलै , २०२४

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
श्रेयस शिपिंग अँड लॉजिस्टिक्स लिमिटेड करिता
सही /-
नम्रता मलुष्टे
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी
(आयईपीएफच्या उद्देशासाठी नोडल अधिकारी)



**CDSL** Convenient · Dependable · Secure

**सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड**
CIN: L67120MH1997PLC112443
**नोंदणीकृत कार्यालय** : युनिट नं. ए-२५०१, मॅराथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल्स कम्पाऊण्ड, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परळ (पू), मुंबई-४०० ०१३, महाराष्ट्र, भारत.
**टेलि.** : ९१-२२-६२३४३०००/३००१
**ई-मेल आयडी** : shareholders@cdslindia.com **वेबसाइट** : www.cdslindia.com

**व्हिडिओ कॉन्फरन्सींग ("व्हीसी")/ अदर ऑडिओ-व्हिज्युअल मीन्स ("ओएव्हीएम")द्वारा घेण्यात येणाऱ्या सत्तावीसाव्या (२७वी) वार्षिक सर्वसाधारण सभेची सदस्यांकरिता सूचना, रेकॉर्ड तारीख व ई-वोटिंग माहिती**

१. **सूचना**, याद्वारा देण्यात येते की, "सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड" ("कंपनी/ सीडीएसएल")च्या सदस्यांची सत्तावीसावी (२७वी) वार्षिक सर्वसाधारण सभा (**"एजीएम"**) या संबंधित निर्गमित केलेले अन्य लागू सर्क्युलर्स आणि सेबीद्वारा निर्गमित केलेले सर्क्युलर नं. सेबी/एचओ/सीएफडी/सीएफडी-पीओडी-२/पी/सीआयआर/२०२४/१३३ दिनांकित ०३ ऑक्टोबर, २०२४ यासह वाचलेल्या सिक्युरिटीज एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर्स रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (**"सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स"**) तसेच निगम कामकाज मंत्रालयाद्वारा (**"एमसीए"**) या संबंधित निर्गमित केलेले अन्य सर्क्युलर्स आणि जनरल सर्क्युलर नं. ०९/२०२४ दिनांकित १९ सप्टेंबर, २०२४, नं. ०९/२०२३ दिनांकित २५ सप्टेंबर, २०२३ व नं. २०/२०२० दिनांकित ०५ मे, २०२० यासह वाचलेल्या, कंपन्या अधिनियम, २०१३ (**"कायदा"**) आणि त्याखाली तयार केलेल्या नियमांच्या लागू तरतुदींच्या अनुपालनार्थ "एजीएम"च्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार, जी "एजीएम" बोलाविण्याकरिता प्रसारित करण्यात येणार आहे, कामकाजावर विचारविनिमय करण्याकरिता कंपनीच्या सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय **"व्हीसी"/ "ओएव्हीएम"**द्वारा **गुरुवार, १४ ऑगस्ट, २०२५ रोजी स. ११.०० वा. इंडियन स्टॅण्डर्ड टाइम ("आयएसटी")** घेण्यात येणार आहे. सदस्य केवळ "व्हीसी"/ "ओएव्हीएम" सुविधेद्वारा "एजीएम"मध्ये सहभागी होऊ शकतील तसेच सभेत हजर राहू शकतील. "एजीएम"मधील सहभागाबाबत सूचना आणि ई-वोटिंगकरिता सविस्तर प्रक्रियेची "एजीएम"च्या सूचनेमध्ये तरतूद करून देण्यात येणार आहे. "व्हीसी"/ "ओएव्हीएम" सुविधेद्वारा सभेमध्ये हजर राहणाऱ्या सदस्यांची गणना कायद्याच्या कलम १०३ अंतर्गत गणसंख्या निश्चित करण्याच्या हेतुप्रीत्यर्थ करण्यात येईल.

२. वरील सर्क्युलर्सच्या अनुपालनार्थ, "एजीएम"ची सूचना आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ करिता एकत्रीकृत वार्षिक अहवाल कंपनीच्या अशा सदस्यांना, ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/ डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत आहेत, केवळ इलेक्ट्रॉनिक प्रणालीत यथावकाश पाठविण्यात येणार आहेत. ज्या सदस्यांकडे डिमटेरिअलाइज्ड स्वरूपात भाग आहेत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सद्वारा कंपनीकडे त्याचे ई-मेल पत्ते व मोबाइल नंबर्सची नोंदणी करावी/ अपडेट ठेवावेत.

३. वित्तीय वर्ष २०२४-२५ करिता एकत्रीकृत वार्षिक अहवाल प्राप्त करण्याकरिता वेबलिंकची तरतूद करणारे पत्र अशा सदस्यांना पाठविण्यात येणार आहे, ज्यांनी कंपनी/ डिपॉझिटरीजकडे त्यांचे ई-मेल आयडी'ज नोंदणीकृत केलेले नाहीत.

४. २७वी "एजीएम" बोलाविणारी सूचना आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ करिता एकत्रीकृत वार्षिक अहवाल **www.cdslindia.com** या कंपनीच्या वेबसाइटवर आणि स्टॉक एक्स्चेंजच्या वेबसाइटवर म्हणजेच **www.nseindia.com** या नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या (**"एनएसई"**) वेबसाइटवर आणि **https://in.mpms.mufg.com** या एमयूएफजी इन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या (पूर्वीची मेसर्स लिंक इन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली) वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. वित्तीय वर्ष २०२४-२५ करिता एकत्रीकृत वार्षिक अहवालासमवेत २७व्या "एजीएम"च्या सूचनेच्या प्रत्यक्ष प्रती सदस्यांना, जे सदर प्रतीकरिता विनंती करतील, पाठविण्यात येणार आहेत.

५. **ई-वोटिंगद्वारा मतदान करण्याची प्रक्रिया** : कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४च्या नियम २० यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम, २०१३च्या कलम १०८ तसेच सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन ४४च्या अनुपालनार्थ, कंपनी "एजीएम"च्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारा (**"एजीएमपूर्वी रिमोट ई-वोटिंग व एजीएम कालावधीत ई-वोटिंग**) सदस्यांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजाविण्याकरिता सुविधेची तरतूद करून देणार आहे. रिमोट ई-वोटिंग व एजीएम कालावधीत ई-वोटिंगकरिता सविस्तर प्रक्रियेची "एजीएम"च्या सूचनेमध्ये तरतूद करून देण्यात येणार आहे.

६. **ई-मेल पत्त्याची नोंदणी/ अपडेटिंगकरिता प्रक्रिया** : सूचना व एकत्रीकृत वार्षिक अहवालाची स्वीकृती होण्याच्या दृष्टीने, सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सकडे त्यांच्या ई-मेल पत्त्यांची नोंदणी करावी/ अपडेट ठेवावेत.

७. **लाभांश व प्रदानासंबंधित रेकॉर्ड तारीख** :

ए) कंपनीने वित्तीय वर्ष २०२४-२५ करिता लाभांशाच्या स्वीकृतीकरिता सदस्यांची पात्रता निश्चित करण्याच्या हेतुप्रीत्यर्थ "**रेकॉर्ड तारीख**" म्हणून गुरुवार, ०७ ऑगस्ट, २०२५ निश्चित केली होती. लाभांशाचे प्रदान, जर "एजीएम"मध्ये घोषित झाल्यास, "एजीएम" संपताच ३० दिवसांच्या कालावधीच्या आत करण्यात येणार आहे.

बी) ज्या सदस्यांकडे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात भाग आहेत, डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सद्वारा तरतूद केलेल्या बँक अकाऊन्ट तपशिलाचा वापर लाभांशाचे प्रदान व प्रिन्टिंग लाभांश वॉरन्ट्सकरिता करण्यात येणार आहे तसेच त्यांना अशीसुद्धा विनंती करण्यात येते की, त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्कडे त्यांचा इलेक्ट्रॉनिक बँक मॅनडेट अपडेट ठेवावा.

सी) लाभांशाचे प्रदान लागू दरांत टॅक्स ॲट सोर्स (टीडीएस) कपातीच्या विषयाधीन असेल. अधिक तपशिलाकरिता कृपया "एजीएम"ची सूचना पाहावी.

८. कोणतीही स्पष्टीकरणे किंवा सहाय्याकरिता, सदस्य संपर्क साधू शकतील- "आरटीए, एमयूएफजी इन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची मेसर्स लिंक इन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली), ई-मेल आयडी: **rnt.helpdesk@in.mpms.mufg.com** किंवा ई-मेल आयडी: **shareholders@cdslindia.com** यावरून कंपनीला लेखी विनंती पाठवू शकतील.

स्थळ : मुंबई
दिनांक : १८.०७.२०२५

संचालक मंडळाच्या आदेशाद्वारा
सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
निलय शाह
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी
सदस्यत्व क्र. : ए२०५८६



**Reliance** Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२–३५५५ ५००० • फॅक्स: ०२२–२२०४ २२६८
ई–मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

**३० जून, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचा अलेखापरीक्षित एकत्रित वित्तीय परिणामांचा संक्षिप्त गोषवारा**

(₹ कोटीत, प्रति समभाग आकडेवारी व्यतिरिक्त)

| तपशील | संपलेले तिमाही ३० जून, २०२५ | संपलेले तिमाही ३० जून, २०२४ |
|---|---|---|
| विक्री व सेवा मूल्य (महसूल) | २७३,२५२ | २५७,८२३ |
| वजा: वसूल केलेला जीएसटी | २४,५९२ | २१,६०६ |
| **प्रचलनाद्वारे महसूल** | **२४८,६६०** | **२३६,२१७** |
| करपूर्व नफा | ३७,१४६ | २३,२३४ |
| **करपश्चात नफा** | **३०,६८१** | **१७,४४८** |
| सहयोगी आणि संयुक्त उपक्रमाचा नफा (तोटा) यातील हिस्सा | १०२ | (३) |
| **करपश्चात नफा आणि सहयोगी आणि संयुक्त उपक्रमाचा नफा (तोटा) यातील हिस्सा** | **३०,७८३** | **१७,४४५** |
| एकुण सर्वसमावेशक मिळकत (करपश्चात)* | ३१,१३४ | १७,७४२ |
| भरणा केलेले इक्विटी समभाग भांडवल, इक्विटी समभाग ₹१०/– मूल्याचा | १३,५३२ | ६,७६६ |
| पुनर्मूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी** | – | – |
| **प्रति इक्विटी समभाग मिळकत (₹ मध्ये) (प्रत्येकी दर्शनी मूल्य ₹१०/–)** | | |
| मूळ (₹ मध्ये) | १९.९५ | ११.१९ |
| सौम्य (₹ मध्ये) | १९.९५ | ११.१९ |

*नियंत्रण विरहित स्वारस्य शेअर समाविष्ट
**३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या वर्षाचा पुर्नमूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी ₹ ८२९,६६८ कोटी.

**टिपा:**

१. 'आयएनडी एएस ३३ – प्रति समभाग मिळकत' नुसार, बोनस समभागाच्या वाटपाला (२९ ऑक्टोबर, २०२४ रोजी वाटप केले) परिणाम देण्यासाठी, ३० जून, २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीचे प्रति समभाग मिळकतीची आकडेवारी पुनर्गठित करण्यात आली आहे.

२. १८ जुलै, २०२५ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकांमध्ये लेखापरीक्षण समितीने वरील परिणामांचा आढावा घेतला आहे आणि संचालक मंडळाने वरील परिणाम मंजूर केले असून ते प्रसारित करण्यास मंजुरी दिली आहे.

२. अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय परिणामांविषयी अधिक माहिती खालील प्रमाणे आहे:

(₹ कोटीत)

| तपशील | संपलेले तिमाही ३० जून, २०२५ | संपलेले तिमाही ३० जून, २०२४ |
|---|---|---|
| विक्री व सेवा मूल्य (महसूल) | १२७,३३५ | १४०,२०२ |
| वजा: वसूल केलेला जीएसटी | ५,९६६ | ५,८७१ |
| **प्रचलनाद्वारे महसूल** | **१२१,३६९** | **१३४,३३१** |
| करपूर्व नफा | २०,३०६ | १०,१४६ |
| **करपश्चात नफा** | **१७,९०४** | **७,६११** |
| एकुण सर्वसमावेशक मिळकत (करपश्चात) | १८,०४० | ८,१०५ |

३. ३० जून, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स ॲन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्टस्) रेग्युलेशन्स्, २०१५ मधील रेग्युलेशन ३३ अनुशंगाने स्टॉक एक्सचेंजकडे सादर करण्यात आले आहेत व वरील परिणाम त्यांचा संक्षिप्त गोषवारा आहेत.

३० जून, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटसवर (**www.bseindia.com / www.nseindia.com**), कंपनीच्या वेबपेजवर **https://www.ril.com/investor/resource-center/corporate-announcements** येथे उपलब्ध आहेत आणि खालील क्विक रिस्पॉन्स कोड स्कॅन करून देखील ते उपलब्ध करून घेता येतील.

दिनांक : १८ जुलै, २०२५

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/–
मुकेश डी. अंबानी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

www.ril.com